

कोल्हापूर : राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेमधील विवेकानंद कॉलेजच्या यशस्वी खेळाडूंसमवेत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार. यांच्यासह प्राध्यापक, प्रशिक्षक. (छाया : अर्जुन टाकळकर)

# विवेकानंद कॉलेजच्या खेळाडूंची राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेजच्या खेळाडूंनी यश संपादन केले. त्यांची डिसेंबरमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

कृष्णा शेळके याने १०० मीटर, २०० मीटर बटरफ्लायमध्ये सुवर्णपदक, धिरीजा मोरे हिने ४०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये रजतपदक पटकाविले. श्रीवर्धन पाटीलने १०० मीटर फ्रीस्टाईल रिले व स्नेहल पाटील याने २०० मीटर बटरफ्लाय प्रकारात कांस्यपदक मिळवले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले.

या खेळाडूंना जिमखाना प्रमुख प्रा. हवालदार, एन. आर. सणगर, प्रा. सहिदा कच्छी, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

24/11/2023

24.11.23

तरुण भारत संवाद

शुक्रवार २४ नोव्हेंबर २०२३

# विवेकानंदच्या खेळाडूंची राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी निवड

कोल्हापूर : पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेजच्या खेळाडूंनी यश संपादन केले. यामध्ये खालील खेळाडूंचा समावेश होता. कृष्णा रणजित शेळके १०० मीटर, २०० मीटर बटरफ्लाय सुवर्ण पदक. धिरीजा रमेश मोरे ४०० मीटर  फ्रीस्टाईल रजत पदक. श्रीवर्धन राजाराम पाटील १०० मीटर फ्रीस्टाईल रिले. स्नेहल साताप्पा पाटील २०० मीटर बटरफ्लाय कास्य पदक. त्यांची दिल्ली येथे डिसेंबर मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांचे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. कुंभार यांनी अभिनंदन केले. खेळाडूंना प्रा. एन. आर. सणगर, प्रा.सहिदा कच्छी, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समिर पठाण, सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

24/11/23

24.11.23